**जिल्हा परिषद, वर्धा**
**कार्यालय : सामान्य प्रशासन विभाग,**
**सिव्हील लाईन, वर्धा- 442001**

**दुरध्वनी क्र.** 07152-243211/ 243889 **ई-मेल** :- dyceogenzpwardha@gmail.com

---

**क्र.जिपव/साप्रवि/आस्था-1/प्र.क्र.08/2026 वशि-315/2026 E-mail द्वारे सार्वत्रिक बदल्या सन-2026** **दिनांक :- 20 एप्रील,2026**

**प्रति,**

1) प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, वर्धा
2) ----------------------------------------(खातेप्रमुख),जिल्हा परिषद, वर्धा
3) गट विकास अधिकारी, पंचायत समिती, ----------------(सर्व)

**विषय : जनगणना 2026 च्या अनुषंगाने जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांच्या बदल्यांबाबत सूचना.**

**संदर्भ** : 1.ग्राम विकास विभाग, शासन निर्णय क्र.जिपब-414/प्र.क्र.122/आस्था-14,दिनांक 15 मे,2014
2. ग्राम विकास विभाग,शासन शुद्धीपत्रक क्रमांक: जिपब-414/प्र.क्र.112/आस्था-14 दि.02 जुलै,2014
3. ग्राम विकास विभाग,शासन शुध्दीपत्रक क्र.जिपब-4816/प्र.क्र.136/आस्था-14, दि.02 जानेवारी,2017
4. ग्राम विकास विभाग शासन पुरकपत्र क्रमांक:जिपब-4817/प्र.क्र.228/आस्था-14 दि. 07 मार्च,2019
5. उप सचिव, महा.शा.ग्राम विकास व जलसंधारण विभाग यांचे पत्र क्र.संकीर्ण-2019/प्र.क्र.800/आस्था-7 दि.08 जानेवारी,2020
6. उप सचिव,महा शासन ग्राम विकास विभाग पत्र क्र.संकीर्ण2023/प्र.क.127/आस्था-14 दि.18 मे,2023
7. ग्राम विकास विभाग शासन पुरकपत्र क्रमांक:जिपब-4817/प्र.क्र.228/आस्था-14 दि. 28 मार्च,2025
8. ग्राम विकास विभाग,शासन शुध्दीपत्रक क्र.जिपब-1125/प्र.क्र.125/आस्था-14, दि.23 मे,2025
9. ग्राम विकास विभाग शासन पुरकपत्र क्रमांक:बैठक-4825/प्र.क्र.106/आस्था-14 दि. 09 सप्टेंबर,2025
10. मा.मुख्य कार्यकारी अधिकारी,जि.प.वर्धा यांचे कार्यालयीन परिपत्रक क्र.जिपव/साप्रवि/आस्था-01/प्र.क्र08/2026 वशि-70/2026 दिनांक 10.01.2026.
11. उपसचिव महा.शा.ग्रामविकास विभाग यांचे पत्र क्रमांक,संकीर्ण-1526/प्र.क्र.83/आस्था-14दि17.04.2026

उपरोक्त विषयाबाबत संदर्भाधीन शासन निर्णय,शासन शुद्धीपत्रक व शासन पत्र याचे अवलोकन करावे.

संदर्भाधीन शासन निर्णय दिनांक 15.05.2014 च्या शासन निर्णयातील गट-क (वर्ग-3) व गट-ड (वर्ग-4) संवर्गाच्या कर्मचाऱ्यांच्या जिल्हयांतर्गत बदल्यांच्या धोरणात संदर्भ क्रमांक (08) दिनांक 23 मे,2025 अन्वये सुधारणा करण्यांत आलेली असुन त्यानुसार गट-क संवर्गातील जिल्हा परिषदेतील कर्मचारी (प्राथमिक शिक्षक संवर्ग वगळून) ज्या जिल्हयात आदिवासी /नक्षलग्रस्त तालुके नसतील त्या जिल्हयात एका तालुक्यातून अन्य तालुक्यात) प्रशासकीय बदली ही 10% अनिवार्य करण्यांत आलेली आहे. (संदर्भ क्रमांक (06) दिनांक 18.05.2023 चे पत्राचे अवलोकन व्हावे.)

त्याच प्रमाणे वरील प्रमाणे विहीत केलेल्या टक्केवारीमध्ये एकही बदलीपात्र कर्मचारी बसत नसल्यास संवर्गनिहाय किमान 01 अथवा 02 कर्मचाऱ्यांची बदली करणेबाबत सुचीत करण्यांत आले आहे.

त्याअनुषंगाने संदर्भिय शासन निर्णय,शासन पत्रे व वेळोवेळी शासनाकडून पारीत शुद्धीपत्रके विचारात घेता दिनांक 10.01.2026 चे संदर्भिय परिपत्रकान्वये शासन निर्णयातील वेळापत्रकानुसार सार्वत्रिक बदली प्रक्रिया सन-2026 बाबत जिल्हा परिषद/पंचायत समिती स्तरावर कार्यवाही करणेबाबत निर्देशित करण्यांत आलेले आहे.

सा. प्र. वि. जिल्हा परिषद वर्धा

परंतु संदर्भ क्रमांक (11) दिनांक 17.04.2026 अन्वये जनगणनेच्या कामाशी संबंधित जिल्हा परिषदेतील गट-क व गट-ड संवर्गातील (जिल्हा परिषदांमधील सर्व शिक्षकांसह) कर्मचाऱ्यांची सन-2026 ची सर्वसाधारण बदली प्रक्रिया राबविण्यांत येऊ नये,असा निर्णय शासनाने घेतल्याबाबत ग्राम विकास विभागाचे पत्र प्राप्त झाले आहे.

करीता आपले अधिनस्त संवर्गातील गट-क व गट-ड मधील जे कर्मचारी प्रशासकीय बदलीस पात्र असुन जे जनगणनेच्या कामाकरीता नियुक्त करण्यांत आलेले आहे (जनगणनेच्या कामाकरीता नियुक्त आदेश असल्यास) अशा कर्मचाऱ्यांची सार्वत्रिक बदली प्रक्रिया सन-2026 मध्ये बदली प्रक्रिया राबविण्यांत येणार नाही (प्रशासकीय बदली प्रक्रियेतून वगळण्यांत यावे.) करीता आपले अधिनस्त संवर्गातील प्रशासकीय बदलीस पात्र असलेले जनगणनेच्या कामाशी संबंधित कर्मचारी यांना वास्तव्य ज्येष्ठतेनुसार समुपदेशनाचे वेळेस जनगणने बाबत नियुक्ती आदेशासह उपस्थित राहणेबाबत कळविण्यांत यावे. तसेच विनंती बदली करीता अर्ज प्राप्त कर्मचारी यांचे नियुक्ती जनगणने करीता असल्यास विनंती बदली अमान्य करण्यांत येईल याची नोंद घ्यावी. (प्रशासकीय बदली /विनंती बदली करीता पात्र कर्मचारी यांचे जनगणनेच्या कामाकरीता नियुक्त आदेश समुपदेशनाचे वेळेस आणने अनिवार्य आहे.)

करीता सार्वत्रिक बदली कालावधी सन-2026 बाबत आपले अधिनस्त सर्व संवर्गातील व पंचायत समिती अंतर्गत जिल्हा परिषदेतील इतर क्षेत्रिय शासकीय कार्यालातील जनगणनेच्या कामाशी संबंधित जिल्हा परिषदेतील गट-क व गट-ड मधील कर्मचारी यांची माहिती त्या-त्या खातेप्रमुखांकडे कळवावी. जनगणने बाबत नियुक्त कर्मचारी वगळता उर्वरीत कर्मचारी यांचे सार्वत्रिक बदली प्रक्रिया सन-2026 बदली प्रक्रिया समुपदेशनाद्वारे संदर्भिय शासन निर्णयातील वेळापत्रक व टक्केवारीनुसार घेण्यांत येईल.

करीता जिल्हास्तरीय सार्वत्रिक बदली प्रक्रिया सन-2026 (एका तालुक्यातून अन्य तालुक्यात) बाबत विभागनिहाय वेळापत्रक व इतर सुचना जिल्हा परिषद,वर्धा चे संकेतस्थळावर (https://zpwardha.maharashtra.gov.in) वेळोवेळी प्रसिद्ध करण्यांत येईल. या बाबत पारीत सुचना विभागप्रमुख व गट विकास अधिकारी पंचायत समिती (सर्व) यांनी त्यांच्या विभागातील व त्यांच्या अधिनस्त असलेल्या सर्व शासकीय विभागातील कर्मचारी यांचे निदर्शनास आपले स्तरावरुन आणुन दयावे.

**सहपत्र : सार्वत्रिक बदल्या सन 2026 - प्रारुप नियमावली**

मा. प्र. वि. जिल्हा परिषद वर्धा

Parag Soman.

**(पराग सोमण,भा.प्र.से.)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद, वर्धा**

**प्रतिलिपी :**

अतिरीक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, वर्धा यांना माहितीस्तव.

# सार्वत्रिक बदल्या सन -2026 प्रारुप नियमावली
## (शिक्षक संवर्ग वगळून)

**प्रस्तावना :**

दरवर्षी प्रमाणे यावर्षी सुद्धा गट-क व गट-ड मधील कर्मचारी यांचे बदल्यांबाबत ग्राम विकास विभागाचे शासन निर्णय दिनांक 15.05.2014 मधील विहीत धोरणानुसार तसेच वेळोवेळी पारीत संदर्भिय शासन निर्णय/शासन शुद्धीपत्रक/ व शासन पत्रानुसार प्रशासकीय बदली प्रक्रिया ग्राम विकास विभागाचे शासन शुद्धीपत्रक दिनांक 23 मे,2025 मधील % (टक्केवारीनुसार) विहीत वेळापत्रकानुसार करण्यांत येत आहे.

त्याच प्रमाणे ग्राम विकास विभागाचे पत्र दिनांक 17.04.2026 अन्वये जनगणनेच्या कामाशी संबंधित जिल्हा परिषदेतील गट-क व गट-ड संवर्गातील (जिल्हा परिषदांमधील सर्व शिक्षकांसह) कर्मचाऱ्यांची सन-2026 ची सर्वसाधारण बदली प्रक्रिया राबविण्यांत येऊ नये याबाबत निर्देशित करण्यांत आले आहे. करीता जनगणनेच्या कामाशी नियुक्त कर्मचारी वगळता (समुपदेशनाचे वेळेस जनगणनेबाबत नियुक्त आदेश अनिवार्य) विनंती बदली करीता 03 वर्षाचा सामान्य कालावधी पुर्ण झाल्यानंतर संबंधीत कर्मचारी यांची बदली प्रक्रिया रिक्त पदे व विभागातील प्रशासकीय कामाचे स्वरुप पाहु जाता समुपदेशनाद्वारे करण्यांत येईल. त्याकरीता रिक्त पदांची स्थिती व प्रशासकीय बदलीने संभाव्य रिक्त होणारे पदे विचारात घेता रिक्त जागांचा समतोल सुध्दा राखणे गरजेचे आहे. त्यामुळे रिक्त पदांचा समतोल राखण्यासाठी प्रशासकीय बदली प्रक्रिया झाले नंतर विनंती बदल्या करतेवेळी समानीकरणाची प्रक्रिया राबविल्या जाणार आहे. त्याअनुषंगाने खालील प्रमाणे नियमावली तयार करण्यात येत आहे.

1. प्रत्यक्ष बदली प्रक्रिया राबविताना प्रशासकीय बदलीस (सुट प्राप्त कर्मचारी वगळून) पात्र कर्मचाऱ्यास वास्तव्य ज्येष्ठता तसेच बदली प्राधान्यक्रमानुसार समुपदेशनाद्वारे रिक्त ठिकाणी पदस्थापना देण्यात येईल. प्रशासकीय बदलीचे प्रमाण 10% व विनंती बदलीचे प्रमाण 10% आहे. समानीकरणा करीता टक्केवारी लागू राहणार नाही.
2. वरील प्रमाणे विहीत केलेल्या टक्केवारीमध्ये एकही बदलीपात्र कर्मचारी बसत नस्ल्यास संवर्गनिहाय किमान 01 अथवा 02 कर्मचाऱ्यांची बदली बाबत निर्णय वेळेवर घेण्यांत येईल.
3. प्रशासकीय किंवा विनंती बदल्या करतांना कर्मचाऱ्याने अगोदर ज्या जागी सेवा केली असेल अशा मूळ जागेवरुन त्या कर्मचाऱ्यांची बदली झाल्यानंतर पुनश्च: अशा मूळ जागी बदली बाबत ग्राम विकास विभागाचे शासन शुद्धीपत्रक दिनांक 02 जुलै,2014 मध्ये नमुद नूसार बदली प्रक्रियेबाबत निर्णय घेण्यांत येईल. मात्र ही बाब एकाकी पदास लागू राहणार नाही.
4. रिक्त पदांचा समतोल साधण्यासाठी विनंती बदली करताना ज्या तालुक्यामध्ये पदांची कमतरता आहे केवळ त्याच ठिकाणी विनंती बदली केल्या जाईल. मात्र ज्या कार्यालयामध्ये/पंचायत समिती मध्ये समान पदे तसेच कमी पदे आहे तेथील कर्मचाऱ्यांची विनंती बदली वेळेवर (+)जादा (-) कमी बाबत पदांची स्थिती पाहुन करण्यांत येईल. तसेच ज्या पंचायत समिती मध्ये जादा कर्मचारी आहेत अशा कार्यालयातून / पंचायत समिती मधूनच कमी कर्मचारी असलेल्या कार्यालयामध्ये / पंचायत समिती मधील विनंती बदली करीता प्राप्त अर्जाचा विचार केल्या जाईल.
5. प्रशासकीय बदली प्रक्रिया झालेनंतर विनंती बदल्या करतेवेळी समानीकरणाची प्रक्रिया राबविण्यात येईल. समानीकरणातील विवरणपत्रानुसार जेथे अधिकची पदे आहेत तेथील कर्मचाऱ्यांना कार्यालयातील / पंचायत समिती मधील सेवाजेष्ठतेनुसार कमी पदे असलेल्या ठिकाणी पदस्थापना देण्यात येईल. यामध्ये एकच पद मंजूर व कार्यरत आहे तेथील

कर्मचाऱ्यांना तसेच एकाकी संवर्ग लागू असलेल्या कर्मचाऱ्यांना समानीकरणाचे तत्व लागू राहणार नाही. (समानिकरणाबाबत % यापुर्वीचे सार्वत्रिक बदली प्रक्रियेनुसार काढावी व त्यानुसार अंतिम वास्तव्य ज्येष्ठतेबाबत प्रपत्र प्रसिद्ध करावे.)

6. जिल्हा परिषदांमधील विविध कर्मचारी संघटनांचे पदाधिकारी यांना प्रशासकीय बदल्यांमधून सूट / पदावधी वाढविणे करिता शासन मान्यता प्राप्त तसेच राज्य / जिल्हा पातळी वरील जिल्हा परिषद कर्मचारी संघटनांचे पदाधिकारी असल्याचे पूरावे तसेच संघटना मान्यता प्राप्त असल्याची प्रमाणित प्रत बदली प्रक्रियेपुर्वी आपआपल्या आस्थापनेकडे सादर करावी.

7. सुट प्राप्त कर्मचारी जसे, मेंदूचा आजार, थॅलेसिमीया विकार ग्रस्त मुलांचे पालक/जन्मजात गुणसुत्राचे दोषामुळे उद्‌भवणारे आजार, अपंग कर्मचारी, अपंग मुलांचे पालक, मतिमंद मुलांचे पालक,पक्षाघात,कर्करोगाने (कॅन्सर) आजारी /डायलेसिस इत्यादी सूट प्राप्त कर्मचाऱ्यांनी तत्सम प्रमाणपत्र तसेच अपंगांच्या बाबतीत 40% च्या वर वैद्यकीय मंडळाचे (ऑनलाईन त्रिसदस्यीय) प्रमाणपत्र तसेच लाक्षणिक दिव्यांग प्रमाणपत्र दि. 27.04.2026 पुर्वी कार्यालयीन वेळेत त्या-त्या खातेप्रमुखाकडे सादर करावे. त्याच प्रमाणे समुपदेशनाचे वेळेस सदर प्रमाणपत्र सोबत आनणे अनिवार्य आहे.

8. प्रशासकीय/विनंती बदली करतांना कर्मचारी यांनी बांधकाम/लघुपाटबंधारे/ग्रापापू या विभागातील उपविभागातील रिक्त पदी समुपदेशनाचे वेळेस बदली बाबत मागणी केल्यास उपविभागातील प्रशासकीय कामे तसेच लिपीकवर्गीय कार्यरत कर्मचारी यांची संख्या विचारात घेऊन बदली बाबत निर्णय घेण्यांत येईल.

9. गट -ड कर्मचाऱ्यांच्या सर्वसाधारण बदलीचा कालावधी निश्चित केलेला नसल्याने. गट-ड च्या कर्मचाऱ्यांची विनंती बदली करीता अर्ज सादर केले असल्यास अशा कर्मचारी यांची प्रशासनाच्या सोईसाठी किंवा कार्यालयीन निकड तसेच ज्या विभागातून बदली करीता अर्ज सादर केला असल्यास त्या विभागातील कार्यरत कर्मचारी यांची संख्या विचारात घेता रिक्त पदांचे स्थितीनुसार विनंती बदली बाबत विचार करण्यांत येईल.

10. समुपदेशनाच्या मार्गदर्शक तत्वांचा अवलंब करुन त्याद्वारे प्रशासकीय कामकाजाची निकड व रिक्त पदे इत्यादी बाबी विचारात घेऊन, प्रशासकीय व विनंती बदली प्रक्रिया राबविण्यांत येत असल्याने समुपदेशनाद्वारे रिक्त पदे पाहु जाता एकदा घेण्यांत आलेल्या पदस्थापनेचे ठिकाणात बदली प्रक्रियेनंतर पदस्थापनेत बदल करणेबाबत प्राप्त अर्जाचा विचार केला जाणार नाही.

(अमोल ज.भोसले)
उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य)
जिल्हा परिषद,वर्धा

Parag Sonaw.
(पराग सोमण,भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद,वर्धा